# <u>जाहिरात</u>

**क्र. राएस्मा/प्र/349 /ओडी, दि. 01.09.2023**

**अधिष्ठाता रा.ए.स्मा. रुग्णालय** यांचे **क्र. केईएम/प्र/348/ओडी, दि. 01.09.2023** मंजुरी अन्वये रा.ए.स्मा. रुग्णालयाच्या आस्थापनेवरील **सहाय्यक वैद्यकीय अधिकारी** संवर्गातील रिक्त असलेली 4 **पदे** तात्पुरत्या स्वरुपातील निव्वळ 40 दिवसांच्या कालावधीकरिता भरण्यासाठी जाहिरातीव्दारे अर्ज मागविण्यात येत आहेत.

**अ) <u>शैक्षणिक पात्रता : -</u>**

1. उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस. पदवी प्राप्त केलेला असावा.
2. उमेदवार हा महाराष्ट्र वैद्यकीय परिषद ( Maharashtra Medical council) यांचेकडे नोंदणीकृत असावा.
3. उमेदवाराने मान्यताप्राप्त रुग्णालयातून सहा महिन्यांचे दोन सत्र आवासी अधिका-याचे पद (House Post) किंवा एक वर्षाचे सलग निवासी वैद्यकीय अधिका-याचे पद (One year Residency Post) इतका अनुभव धारण केलेला असणे आवश्यक आहे.
4. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत १०० गुणांचा मराठी विषय (निम्न स्तर किंवा उच्च स्तर) घेऊन उत्तीर्ण असावा.
5. उमेदवार 'डी.ओ.ई.ए.सी.सी.' सोसायटीचे 'सी.सी.सी.' किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' किंवा 'बी स्तर' किंवा 'सी स्तर' स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिकी शिक्षण मंडळाचे 'एम. एस. सी. आय. टी.' किंवा 'जी. ई. सी. टी.' चे प्रमाणपत्र धारक असावा.

**ब) वेतनश्रेणी : - 15600 – 34800 /- + ग्रेड पे 5400/-**

**क) अर्ज स्विकारण्याबाबत : -**

इच्छुक उमेदवारांना कॉलेज बिल्डिंग, तळमजला, रुम.नं. 56, येथून रु. 354/- भरून **दि. 01.09.2023 व 04.09.2023 रोजी सकाळी 11.00 ते दुपारी 04.00** अर्ज उपलब्ध होतील. अर्जासोबत शैक्षणिक अर्हतेच्या सर्व कागदपत्रांच्या **साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती (Attested Xerox)** जोडणे आवश्यक आहे.

**ड) स्थळ : -**

उमेदवाराने आपला **अर्ज व सर्व शैक्षणिक मूळ कागदपत्रांसह दि. 05.09.2023** रोजी **सकाळी 11.00 वाजता** उप अधिष्ठाता, रा.ए.स्मा.रुग्णालय यांचे दालनात स्वखर्चाने मुलाखतीस उपस्थित रहावे. (विहित दिनांक व वेळेनंतर आलेल्या उमेदवारांच्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.)

**टीप-**

उमेदवाराची तात्पुरत्या सहाय्यक वैद्यकीय अधिकारी पदावरील नेमणूक ही निव्वळ 40 दिवसांकरिता असेल किंवा नियमित तत्वावर **सहाय्यक वैद्यकीय अधिकारी** ची भरती केल्यास यापैकी जे अगोदर असेल त्या दिनांकापर्यंतच असेल. तद्‌नंतर उमेदवाराची तात्पुरत्या पदावरील सेवा आपोआप संपुष्टात येईल.

सही/-*01.09.2023*

**उप अधिष्ठाता**

रा.ए.स्मा.रुग्णालय